महाराष्ट्र शासन
**नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**सहसंचालक, नगररचना, पुणेविभाग, पुणे.**
२१२, दुसरा मजला, नविन प्रशासकिय इमारत,विधान भवनासमोर, पुणे - ४११००१.
दुरध्वनीक्रमांक - ०२०-२६१२५९२२ Email ID:jdtpdn_pune@rediffmail.com

**जाहिरात क्र.२/२०२३**

## शिपाई पदासाठी शिफारस पात्र उमेदवारांना सुचना

१) वरील शिफारस पात्र यादीमध्ये नाव समाविष्ट केले म्हणजे त्या उमेदवारास नियुक्ती दिली असा अर्थ होत नाही.

२) उमेदवाराची अंतिम नियुक्ती ही संबंधित उमेदवाराची ओळख / कागदपत्रे / प्रमाणपत्रे पडताळणी, वैद्यकीय तपासणी अहवाल, चारित्र्य पडताळणी अहवाल त्याचप्रमाणे समांतर आरक्षणाच्या अनुषंगाने सादर प्रमाणपत्रांची सक्षम प्राधिकारी यांचेकडून पडताळणी केल्यानंतरच करण्यात येणार आहे.

३) उमेदवाराने सादर केलेली माहिती चुकीची / खोटी आढळल्यास अगर कोणतेही प्रमाणपत्र संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी अवैध / बाद ठरविल्यास, तसेच वैद्यकीय तपासणी / चारित्र्य पडताळणी अहवालानुसार अपात्र ठरविल्यास, संबंधित उमेदवाराचे नाव वरील शिफारस यादीमधून कमी करण्यात येईल व त्यानंतर राज्यस्तरावरील प्रतिक्षायादीतील गुणानुक्रमे पुढील उमेदवारास संधी देण्यात येईल.

४) दिव्यांग उमेदवाराचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या पदांचा तपशील शासन नगर विकास विभागाकडील निर्णय संकिर्ण -५०२१/१०१/प्र.क्र.३९/नवि-२७, दि. ०२/०३/२०२१ नुसार दिव्यांगांसाठी शासनाने सुनिश्चित केलेल्या पदानुसार जाहिरातीत नमूद करण्यात आलेली आहे. सदर तपशील पुढीलप्रमाणे आहे.

(i) २ posts for a) B — Blind, LV — Low Vision
(ii) १ post for b) D-Deaf, HH — Hard of Hearing
(iii) १ post for c) OL- One Leg, OAL- One Arm Leg, CP — Cerebral Palsy, LC — Leprosy cured, DW- Dwarfism/ AAV — Acid Attack Victims

५) समांतर आरक्षणामध्ये दर्शविण्यात आलेल्या संक्षिप्त शब्दाचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे.
i) G-सर्वसाधारण, ii) W- महिला, iii) SP-खेळाडू. iii) EX- माजी सैनिक, iv) PT- अंशकालीन उमेदवार, v) PA प्रकल्पग्रस्त उमेदवार

६) शिफारस पात्र उमेदवारांना गुणवत्ता यादीतील नंबर तसेच त्यांनी दिलेला प्राधान्यक्रम तसेच संबंधित विभागातील पदाची उपलब्धता याचा एकत्रित विचार करुन विभाग वाटप करणेत आलेले आहे. कागदपत्रे तपासणी कामी शिफारस पात्र उमेदवारांना संबंधित कार्यालयामार्फत दि.२६.०२.२०२४ नंतर कळविण्यात आल्यानुसार त्यांनी वाटप करणेत आलेल्या कार्यालयांशी त्वरीत संपर्क साधावयाचा आहे.

७) समान गुण मिळालेल्या उमेदवारांचा गुणवत्ता यादीतील प्राधान्यक्रम शासन निर्णय क्र.प्रानियं-१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दि.०४.०५.२०२२ अन्वये विहित केलेल्या निकषानुसार निश्चित करणेत आलेला आहे.

| अ.क्र. | विभागीय कार्यालयाचे नाव | विभागीय कार्यालयाचे नाव व पत्ता | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे | २१२, दुसरा मजला, नविन प्रशासकिय इमारत,विधान भवनासमोर, पुणे - ४११००१.<br>Email ID: jdtpdn_pune@rediffmail.com | ०२०-२६१२५९२२ |
| २ | सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, नवी मुंबई | कोकण भवन, तिसरा मजला, बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४<br>jdtpdn__kokan@rediffmaill.com | ०२२-२७५७ २२७१ |
| ३ | सहसंचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक | नाशिक, नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पहिला मजला, विभागीय आयुक्त कार्यालय आवार, नाशिक रोड ४२२ ००१<br>jdtpdn__nashik@rediffmail.com | ०२५३-२४६ २३०५ |
| ४ | सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती | "निलगिरी" .अगरवाल यांची इमारत, विजय कॉलनी, कॉग्रेसनगर रोड, डॉ.जामठे दवाखान्याजवळ, अमरावती ४४४६०६<br>jdtpdn__amravati@rediffmail.com | ०७२१-२५७० २२६ |
| ५ | सहसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर | जुने सचिवालय इमारत, कक्ष क्र.१०८/१०९ पहिला मजला, सिव्हील लाईन्स, नागपूर- ४४० ००१<br>jdtpdn_nagpur@rediffmail. com | ०७१२ – २५६ ५०२० |
| ६ | सहसंचालक, नगर रचना, छ.संभाजीनगर विभाग, छ.संभाजीनगर | गृहनिर्माण मंडळ इमारत, दुसरा मजला, हॉटेल प्रिन्ट्रव्हल समोर, स्टेशन रोड, छ.संभाजीनगर ४३१००१<br>jdtp.aurangabad@maharashtra.gov.in | ०२४०-२३३४३५४ |

**(कल्याणी पाटील)**
सदस्य सचिव,
राज्यस्तरीय निवड समिती (गट-ड)
तथा
सहायक संचालक, नगर रचना,
सहसंचालक नगर रचना
पुणे विभाग, पु णेयांचे कार्यालय

**(अ.म.पवार)**
अध्यक्ष,
राज्यस्तरीय निवड समिती (गट-ड)
तथा
सहसंचालक नगर रचना
पुणे विभाग, पुणे.